स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

जा.क्र.कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ३० डिसेंबर, २०२३

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी पार्क दादर, मुंबई येथे होणा-या राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलनासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पाच विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

तीन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींचा या पथसंचलनासाठी निवड झाली आहे. त्या आधी दि. १७ ते २६ जानेवारी या कालावधीत कलिना येथे तालिम शिबीर होणार आहे. या पाच विद्यार्थ्यांमध्ये सोनू खूशावह (पुज्य साने गुरूजी विद्या प्रसारक मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा), ज्ञानेश्वर अंजीखाने (समाजकार्य विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), विशाल कोळी (गरूड महाविद्यालय, शेंदुर्णी), हे तीन विद्यार्थी आणि वैष्णवी पाटील (पर्यावरणशास्त्र विभाग, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव), कल्याणी क्षीरसागर (झेङ बी. पाटील महाविद्यालय, धुळे) या दोन विद्यार्थिनींचा समावेश आहे. निवड झालेल्या रासेयो स्वयंसेवकांचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, रासेयो संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी अभिनंदन केले आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ३० (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी दि. २९ डिसेंबर रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू म्हणून सुत्रे स्वीकारली.

कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्याकडून डॉ. माहेश्वरी यांनी पदभार स्वीकारला. यावेळी अमरावती विद्यापीठाचे प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर यांच्यासह विद्यापीठातील व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर प्रा. माहेश्वरी यांनी शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख/अधिकारी, व्यवस्थापन परिषद सदस्य यांची बैठक घेवून चर्चा केली व त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वास

जनसंपर्क अधिकारी